# फिलाडेल्फिया अधिवेशनाच्या रजिस्ट्रेशनचा ओघ सुरूच ! धन्य तो मराठीबाणा !!



*फिलाडेल्फिया गणेश फेस्टिव्हलची गणपती मिरवणूक मागच्या चार पाच वर्षांपासून बरीच प्रसिद्ध झाली आहे. त्याहून भव्य व आजपर्यंत अमेरिकेत झाली नसेल अशी मिरवणूक यंदाच्या अधिवेशनात उद्घाटनाच्या दिवशी निघेल. समस्त उत्तर अमेरिकेतील मराठी शाळा व मंडळे यात सहभागी होतील.*

*उजवीकडे : मिरवणूकीची प्राथमिक संकल्पना -->*




प्रत्येक गटामध्ये ४ ते ५ सेलेब्रिटीज आर्टिस्ट सोबत चालणार, अभिवादन करणार..

## अधिवेशनांमध्ये प्रथमच! मराठी शाळा व मंडळांची भव्य मिरवणूक !! अभूतपूर्व प्रतिसाद !!!

अमेरिकेतील सर्व मराठी बांधव अधिवेशनाला भरभरून प्रतिसाद देत आहेतच. त्या सोबत भर म्हणूनच की काय, अनेक मराठी मंडळे देखील उत्साहाने अधिवेशनाच्या बातम्या, लोगो आपापल्या संकेतस्थळावर देत आहेत. याहू ग्रूप्सच्या MM_Samanvay या ग्रुपवर जवळ जवळ ४० हून अधिक मराठी मंडळांचे अध्यक्ष विचारांची देवाण घेवाण करतात. दोन आठवड्या पूर्वी, यंदाच्या अधिवेशनामध्ये परेड काढण्याची कल्पना जेंव्हा सादर केल्या गेली, तेंव्हा त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या परेडमध्ये टोरांटो, न्यूजर्सी, फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन डीसी, फ्लोरिडा, ओहायो येथील व इतर ठिकाणच्या मराठी शाळा व मंडळं भाग घेणार आहेत.

परेड मध्ये भाग घेतल्याने प्रथमच बाल गोपालांना, मराठी शिकणारे आपण एकटेच आहोत, असे वाटणार नाही. त्याच बरोबर मराठी शाळांना देखील विचारांची देवाण घेवाण करण्यास व एकमेकांपासून शिकण्याची संधी मिळेल. यंग अडल्ट मंडळींना देखील आपली मराठी भाषा वापरण्याची सुसंधी मिळेल.

आपल्या मंडळास किंवा मराठी शाळेस जर परेड मध्ये भाग घ्यावयाचा असेल व आपण किमान ८ ते १५ मुलांचा गट जमू शकत असल्यास, कृपया ३१ मार्च पर्यंत किरण जोगळेकर यांना dholki@hotmail.com या पत्त्यावर ईमेल पाठवावी. मुलांनी परेडमध्ये मराठी गाण्यांवर नृत्य करावीत अशी अपेक्षा आहे. कोळीनृत्य, लावणी, मंगळागौर, बाळ्या, गोधळ व त्याच बरोबर, लेझिम, टाळ मृदंग, ढोल ताशा यांच्या पथकांचे स्वागत आहे. १५ एप्रिल पर्यंत सर्व पथकांना त्यांचा परेड मधील अनुक्रमांक कोणता, ते कळविल्या जाईल. त्यानंतर प्रत्येक शाळेने आपापल्या पथकाचा सराव सुरू करायचा आहे. परेडच्या मुख्य संचालकाकडून सर्वांना टेलिफोनवरून मार्गदर्शन लाभेल www.BMM2009Philadelphia.org

## पाच हजारांच्या गर्दीमध्ये केवळ ५०० डॉलर्स अधिक देऊन देणगीदारांना पुढे बसण्याची सुवर्णसंधी

१००० ची देणगी देणाऱ्या दात्यांना २ रजिस्ट्रेशन्स व फूड पॅकेट (अंदाजे किंमत ५०० डॉलर्स) मिळतात. बसण्याची व्यवस्था मात्र बरीच पुढे, देणगीदार विभागात होते. याप्रमाणे जोडप्यामागे केवळ ५०० डॉलर्स अधिक देऊन आपल्याला मुख्य सभागृहात पुढे बसून कार्यक्रमांचा आनंद घेता येतो. नवीन देणगीदारांना प्रोत्साहन म्हणून त्यांना मॅरियट मधील काही आरक्षित रूम्स देखील आम्ही उपलब्ध करून देवू शकू.

ज्यानी साधे रजिस्ट्रेशन केलेले आहे त्यांना, ईच्छा असल्यास आपले रजिस्ट्रेशन देणगीदार म्हणून सहज अपग्रेड करता येईल. त्यासाठी कृपया निधी संकलन समितीचे प्रमूख श्री. जगदीश वासुदेव (फोनः ६०९ ३३२ ०३९७) यांना संपर्क करावा.

नव्याने रजिस्ट्रेशन करणाऱ्यांना देखील देणगीदार होणे ऑनलाईन नोंदणी करतांनाच सहज शक्य आहे. देणगी संबंधी प्रश्न असल्यास श्री. जगदीश वासुदेव (फोनः ६०९ ३३२ ०३९७) मदतीस तत्पर आहेत.

## ट्रेड फेअर मधील स्टॉल्सवर मोठी सूट!

अधिवेशनामध्ये जवळजवळ १५० स्टॉल्स लागणार आहेत. प्रथमच नोंदणी झालेल्या मराठी सभासदां सोबतच, सामान्य माणसाला देखील यंदाच्या ट्रेडफेअरचा प्रवेश दुपारी १२ पासून विनामूल्य आहे. स्टॉल्सच्या दरांमध्ये मोठा अर्लिबर्ड डिस्काउंट ३१ मार्च पर्यंतच मिळणार आहे. त्यासाठी श्री. किशोर गोरे ( ६०९ ७२१ २३०८) यांना संपर्क करा. expo@bmm2009Philadelphia.org

BMM 2009 Philadelphia
July 2-5, 2009

# US-India Trade Fair & Expo

www.bmm2009philadelphia.org



## Attractions for Expo Visitors

Large Ethnic Bazar
Bollywood and Sports Celebrities
Wide Variety of Food
Raffles and Door Prizes
Expo during 'Welcome America' Week
90,000 Sq.Ft of Air Conditioned Space

## Exhibit Space Rental Charges

expo@bmm2009philadelphia.org

| 10' X 10' | 15' X 10' | 20' X 10' | 20' X 20' |
|---|---|---|---|
| 2 Tables, 3 Chairs | 2 Tables, 3 Chairs | 3 Tables, 3 Chairs | 5 Tables, 4 Chairs |
| 3 Track lights | 3 Track lights | 6 Track lights | 9 Track lights |
| 1 Power Outlet | 1 Power Outlet | 2 Power Outlet | 3 Power Outlet |
| Drapery Walls, Carpeted Exhibit Booth, Waste Basket, Identification Sign | | | |
| | | | |
| ~~$2000~~ * List Price | ~~$3000~~ * List Price | ~~$4500~~ * List Price | ~~$8500~~ * List Price |

- Location Premium, Discount for Groups, Micro Businesses and NGOs is available as applicable

*Please call Kishor Gore for Early Bird Discounts by 3/31/09

- Additional Furniture, Lights, Power Outlets, Internet connection available at additional charges
- Services like Merchandise Consolidation, Shipping, Clearance, Storage and Delivery to Exhibit Floor available at additional Charges
- Exhibitor are required to purchase their own Exhibitor's Insurance.

**Contact**
Kishor Gore (609) 721-2308
Sanjeev Deshmukh (610) 676-0833
Rajesh Wajge (610) 578-0396
expo@bmm2009philadelphia.org

## अधिवेशनाची नोंदणी (रजिस्ट्रेशन) ५० टक्के संपली ! क्रेडीट कार्ड पेमेंट सुविधा परत सुरू !! रजिस्ट्रेशन फेरबदल संबंधी विशेष सूचना !!!

आपल्या बी.एम.एम. अधिवेशनासाठी आता पर्यंत देणगीदार मिळून अंदाजे २६०० मंडळींनी नोंदणी केली आहे. ज्यांनी अजून नोंदणी केली नाहीये त्याच्यासाठी खास विनंती की त्यांनी शेवटच्या मिनीटापर्यंत वाट न बघता लवकरात लवकर ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी. मध्यंतरी काही तांत्रिक अडचणींमुळे बंद असलेली क्रेडीट कार्ड पेमेंट सुविधा परत सुरू झाली आहे.

बऱ्याच जणांना आपल्या रजिस्ट्रेशन मध्ये बदल करायचे आहेत, कुटूंबातील जादा सदस्यांची नावे टाकायची आहेत किंवा कॉन्फरन्सेससाठी राहून गेलेली नोंदणी करायची आहे. त्यांनी कृपया registration@bmm2009philadelphia.org या ईमेल वर तसे कळावावे. त्यांना नोंदणी फेरबदल करण्यासाठीच्या फॉर्मची लिंक पाठविण्याची व्यवस्था करू.

२ जुलै रोजी ठेवलेला आशाताईंचा हिंदी कार्यक्रम हे या अधिवेशनाचे प्रमुख आकर्षण ठरत आहे. त्याची तिकीटे सुद्धा आपण ऑनलाईन नोंदणी फॉर्मवर घेऊ शकता. अजून महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा कार्यक्रम सगळयांसाठी असल्याने तुमच्या अमराठी मित्रांना पण या  कार्यक्रमाची तिकीट ऑनलाईन नोंदणी फॉर्मद्वारे विकत घेता येतील.

## डबल ट्री, लोज मध्ये बऱ्याच रूम्स उपलब्ध ! डबल ट्री पासून फ्री बस सुविधा !!

अजुनही डबल टी हॉटेल मध्ये १५० पेक्षा जास्त स्वस्त व प्रशस्त रूम्स उपलब्ध आहेत. केव्हळ १२९ डॉलर्स प्रति रात्र दराने फिलाडेल्फियाच्या मध्यवर्ती भागामध्ये रूम्स मिळणार नाहीत. कन्व्हेंशन सेंटर पासून हे हॉटेल ८ ते ९ ब्लॉक दूर असल्याने, आम्ही सकाळी व रात्री आपल्याला विनामूल्य बस सुविधा पुरवू.

केवळ २ ब्लॉक दूर असलेल्या लोज या ४ स्टार हॉटेल मध्ये देखील ७५ ते १०० रूम्स बृममंच्या १४९ डॉलर्स प्रति रात्र या कमी दरामध्ये उपलब्ध आहेत. हा सवलतीचा दर संपायच्या आत हॉटेल्स बुक करा. hotels@bmm2009philadelphia.org हया ईमेलवर कळविल्यास, आपल्या सर्व हॉटेल्सशी निगडीत प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करू.

## अधिवेशनामध्ये होणार जंगी चित्रपट महोत्सव !!

यंदापासून प्रथमच आपण द्वैवार्षिक चित्रपट महोत्सवाची सुरूवात करत आहोत. त्याला निर्मात्यांकडून जंगी प्रतिसाद मिळतोय. आता पर्यंत मॉडर्न फिल्म 'पिकनिक', झी गौरव पुरस्कृत 'मर्मबंध', 'वावटळ', 'मेड इन चायना', 'रंगीबेरंगी', 'दुःखाची श्वापदं', 'चिंगी, गंधा', 'जोगवा' व विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर आधारित 'गाभ्रिचा' पाऊस इत्यादि चित्रपटांच्या प्रवेशिका आल्या आहेत.